## अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ

**सत्र खटला क्र. ३४ /२०२०**
**निशाणी क्र. ८२**

**महाराष्ट्र शासन** **सरकारी अभियोक्ता**
**..वि..**
**राजू व इतर** **आरोपी.**

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ४** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | पुरुषोत्तम मारोतराव सोडगिर |
| वय अंदाजे ५८ वर्षे | धंदा- नौकरी, पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन अवधूतवाडी |
| राहणार | यवतमाळ जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

सन २०१२ मध्ये मी पोलीस स्टेशन कळंब येथे पोलीस हेड कॉन्सटेबल म्हणून कार्यरत होतो. दिनांक १९/१/२०१२ रोजी मी पोलीस स्टेशन कळंब येथे अंमलदार म्हणून कर्तव्यावर हजर होतो. त्यावेळी शेख साबू शेख गणी हा जखमी अवस्थेत पोलीस स्टेशनमध्ये आला व त्याच्या डोक्याला मार होता. त्यामुळे मी त्याला एका कर्मचा–यासोबत त्याच्या वैद्यकीय तपासणीकरीता त्याला पाठवले. वैद्यकीय तपासणी नंतर शेख साबू शेख गणी हा परत पोलीस स्टेशनमध्ये आला. त्यानंतर मी त्याचा रिपोर्ट लिहिण्यास सुरुवात केली असता तो म्हणाला की "मला रिपोर्ट द्यायचा नाही, मला त्या आरोपींची नावे माहिती नाही". त्यानंतर चापरर्डा येथे म्हशीचा अपघात झाल्याबाबत मला फोन आला व तशी माहिती मी ठाणेदारांना दिली व त्यांनी मला त्या घटनास्थळावर पाठविले. थोड्या वेळानंतर मी पोलीस स्टेशनला परत आलो असता पोलीस स्टेशनला माहिती मिळाली की १० ते १२ लोक हे श्री पड्डा यांच्या घरात घुसून सामानाची फेकफाक केलेली आहे. त्यानंतर मी पोलीस निरीक्षक श्री ठोसरे साहेब यांच्यासोबत पड्डा यांच्या घराकडे गेलो व पड्डा यांना घेवून आम्ही पोलीस स्टेशनला आलो. त्यानंतर २०.०० वाजता माझी ड्यूटी संपली व माझा पदभार मी दुस–याला दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री ठोसरे यांच्यासोबत जावून ४ ते ५ इसम घेवून आलो. मी पदभार दिल्यावर श्री पड्डा यांच्या

कैफियतीवरुन गून्हा क्रमांक १२/२०१२ नोंदविण्यात आला. त्यावेळी पोलीस स्टेशनमध्ये अंदाजे १०० ते १५० लोक जमलेले होते व त्या लोकांनी आम्हाला म्हटले की "या लोकांना आमच्या ताब्यात दया, आम्ही त्यांना पाहून घेतो", तसेच त्या लोकांनी दगडफेक केली आणी गाडयांच्या काचा फोडल्या. त्या १०० ते १५० लोकांच्या जमावामध्ये अभिशेख पांडे, तुषार काळे, राजू ठाकरे, सोनू पड्डा व अक्षय मानकर हे होते. त्यानंतर आम्ही यवतमाळ येथून पोलीस कर्मचारी बोलाविले व त्या पोलीसांनी तो जमाव पांगविला. त्यानंतर तो जमाव बस स्टॅन्ड परीसरामध्ये गेला व हॉटेल व पानठेल्याची तोडफोड केली. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. ज्या लोकांनी तोडफोड केली होती ते आज न्यायालयामध्ये आरोपी म्हणून हजर आहे.

<u>**उलटतपास आरोपींचे वकील श्री. ईम्रान देशमुख यांच्यामार्फत शपथेवर सुरु –**</u>

२. शेख साबू शेख गणी यांना दिनांक १९/०१/२०१२ रोजी वैद्यकीय तपासणीकरीता पाठवण्याबाबतचे व वैद्यकीय तपासणी करुन आल्याबाबतचे दस्तऐवज पोलीस स्टेशनला उपलब्ध होते. चापरर्डा येथे म्हशीचा अपघात झाल्याबाबत आलेल्या फोनबाबतची नोंद स्टेशन डायरीला आहे. तपास अधिका–यांना हे सर्व दस्त दिल्याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की तसे काही घडलेले नसल्यामुळे मी ते दस्तऐवज तपास अधिका–यांना दिले नाही.

३. कथितपणे काच फोडलेल्या गाड्यांचे विवरण उपलब्ध होते. वाहन बघितल्यानंतर मला वाहन कोणत्या प्रकारचे आहे हे मला समजते. तपास अधिकारी शेख हे कळंब पोलीस स्टेशनला कार्यरत होते. हे म्हणणे खरे नाही की मी श्री शेख यांच्या अधिनस्त काम करत होतो. माझ्या समक्ष तपास अधिका–यांनी जप्ती पंचनामे तयार केले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की जमावाने वाहनांची व हॉटेलची तोडफोड केली तसेच दगडफेक केली. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की बस स्टॅन्डकडे जावून पानठेला व हॉटेलची तोडफोड जमावाने केली. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्यापूर्वी

मी जमावातील व्यक्तींना ओळखत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की मी वर उल्लेखीत आरोपींची नावे शेख व श्री ठोसरे यांच्या सांगण्यावरुन सांगीतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सांगीतलेले आरोपी कथित जमावाचा भाग नव्हते. हे म्हणणे खरे नाही की कळंब येथील मुस्लीम समाजाच्या व्यक्तींच्या सांगण्यावरुन ठोसरे साहेबांनी खोटा रिपोर्ट दिला. हे म्हणणे खरे नाही की सरतपासणीमध्ये सांगीतल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की न्यायालयात हजर असलेल्या आरोपींना मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की आरोपींचा कथित घटनेसोबत कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की मी श्री शेख व श्री ठोसरे यांच्या दबावामुळे आज खोटी साक्ष देत आहे.

**उलतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

दिनांक – ०४/०५/२०२६